# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दिनांक - ०९/०२/२०१८

## नक्षलविरोधी भुमकाल रॅलीच्या माध्यमातुन
## गडचिरोली जिल्हयात आदिवासी नागरिकांचा जनआक्रोश

गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी महीला-पुरुष, प्रतिष्ठीत नागरिक व शालेय विदयार्थ्यांनी नक्षलविरोधी भुमकाल रॅली काढुन नक्षलवादयांनी अत्यंत निर्घुणपणे हत्या केलेल्या ०८ निष्पाप आदिवासींच्या हत्येच्या निषेधार्थ जनआक्रोश करीत नक्षलविरोधी भुमकाल रॅली काढली.

आदिवासींना जल, जंगल, जमिनीचे स्वप्न दाखविणाऱ्या नक्षलवादयांनी भुमकाल दिनाच्या पर्वावर गडचिरोली जिल्हयातील ताडगाव परिसरातील कसनासुर येथे येथील ०६ आदिवासींना पळवुन नेवुन ०३ आदिवासींची क्रुरपणे हत्या केली. गावातल्या निरपराध आदिवासींच्या घरगुती सामानाची नासधुस करुन गाव सोडण्यास भाग पाडले. धोडराजजवळील जुवी नाला येथील ०१, एटापल्लीतील ताडगुडा येथील ०१ व विसामुंडी येथील ०१ तसेच धानोरा तालुक्यातील सावरगाव हद्दीत ०२, अशा एकुण ०८ निष्पाप आदिवासींची हत्या केली आहे. तर काही भागात आदिवासींना मारहाण केली, काही भागात जाळपोळ करुन आदिवासींच्या मालमत्तेच नुकसान केले. काही भागात लाल कापडी बॅनरमधुन आदिवासी विकास विरोधी मजकुर लिहुन आदिवासीं जनतेमध्ये दहशत निर्माण केली आहे.

नक्षलवादयांनी गडचिरोली जिल्हयातील सामान्य आदिवासीवर अत्याचार करुन, निरपराध आदिवासी जनतेचे खुन केले आहे तसेच त्यांना विकासापासुन वंचित केले आहे याचा आक्रोश म्हणुन आज जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील ५५ ठिकाणी नक्षलविरोधी भुमकाल रॅली काढली. यामध्ये १५ ते १७ हजार आदिवासी बांधवांचा समावेश होता.


भूमकाल रैली


नक्षलवाद हटाव,
गडचिरोली बचाव.